# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा मजला, शहीद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.
Email:- excise_jtcom_admn@mahaonline.gov.in, Fax No.२२६६२३७०, ph No. २२६२०१६३

## परीपत्रक

क्रमांक :-इएसटी १२१५/७४/२-अ-१ मुंबई, दि. १२ मे, २०१६.

राज्य उत्पादन शुल्क विभागातील जिल्हास्तरावरील अधीक्षक, उपअधीक्षक तसेच तालुकास्तरावरील निरीक्षक, दुय्यम निरीक्षक संवर्गातील अधिकारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर राहत नाही. किंबहूना कार्यालय कुलूपबंद असते. त्यामुळे कार्यालयात विविध कारणांकरीता सामान्य नागरीक, परवानाधारक, सामाजिक कार्यकर्ते वा अन्य यांना संबधित कार्यालयात अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांची भेट होत नाही. परिणामी कार्यालयीन कामकाज विहीत वेळेत पुर्ण होत नाही. अथवा त्यांच्या अडचणींचे निराकरण होत नाही. जिल्हास्तरावरील व क्षेत्रीय स्तरावरील अनेक अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत या कार्यालयात तक्रारी प्राप्त होत असतात. त्यांमुळे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क हे जिल्हास्तरावर कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असल्याने त्यांनी शासकीय कामकाजाकरिता कार्यालयात येणाऱ्या अनुज्ञप्तीधारक, सामान्य नागरीक, अभ्यागत यांना भेटण्यासाठी प्रत्येक आठवडयात किमान २ दिवस निश्चित करुन त्या दिवशी कार्यालयात हजर राहण्याची दक्षता घ्यावी. कार्यालयीन कामकाजाचे दिवशी आपण शासकीय कामकाजानिमित्त मुख्यालयात अनुपस्थित राहणार असल्यास कार्यालयातील कार्यालय अधीक्षक, निरीक्षक यांना त्याबाबत कल्पना देणे आवश्यक आहे, जेणेकरुन कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांना त्याप्रमाणे कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी माहिती देवू शकतील.

तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकाऱ्यांनासुद्धा कार्यालयात हजर राहण्याबाबत उपरोक्तप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्याची कार्यवाही करण्याबाबत त्यांच्या स्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच संबधित अधिकारी/कर्मचारी सदर सुचनांचे पालन करतात किंवा नाही याबाबतही अचानकपणे क्षेत्रीय कार्यालयास भेट देऊन अथवा कार्यालयातील जेष्ठ अधिकाऱ्यांना अशा सुचना देवून क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा. क्षेत्रीय अधिकारी त्यांचे कार्यक्षेत्रातील अनुज्ञप्तींचे निरीक्षण / गुन्हाअन्वेषण / न्यायालयीन व इतर महत्वाच्या कामकाजाव्यतिरीक्त कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर राहतील याबाबत दखल घ्यावी. राज्य उत्पादन शुल्क विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी त्यांचे कार्यालयातील उपस्थितीबाबतचा उपरोक्तप्रमाणे कार्यक्रम निश्चित

करून कोणत्याही अभ्यागतांकडून आपले अथवा आपले अधिनस्थ अधिकारी/कर्मचाऱ्यांचे अनुपस्थितीबाबत तक्रार प्राप्त होणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी, अन्यथा सदर प्रकरणी संबधित अधिकाऱ्यास जबाबदार धरुन कारवाई करण्यात येईल.

स्थळ प्रत मा.आयुक्तांच्या मान्यतेने.

Tanuja 12/5/16

(तनुजा दांडेकर)
सह आयुक्त (प्रशासन)
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. सर्व अधीक्षक, उपअधीक्षक, निरीक्षक, दुय्यम निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क.
२. या कार्यालयातील का.क्र.२.अ.२, प्रदक-१०,९, १२.